# प्रेसनोट

उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिक क्रमांक ९२/२०१३ मध्ये दिनांक १७/७/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यात पार्किंग झोन व्यतिरिक्त अन्य ठिकाणी पार्क केलेली वाहने तसेच रस्त्यावर सोडून दिलेल्या वाहनांवर कारवाई करणेबाबत उच्च न्यायालय मुंबई यांनी आदेश दिले आहेत.

त्यानुसार जिल्हयातील सर्व बस स्थानके, रेल्वे स्थानके, तसेच गर्दीचे रस्ते यावर वाहने पार्क करुन जागा अडविणा–या व रहदारीस अडथळा आणणा–या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

सार्वजनिक रस्त्यांवर सोडून देण्यात आलेली बेवारस वाहने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ कलम २२२ नुसार तसेच मोटार वाहन कायदा १९८८ कलम १२२ अन्वये पोलीस ताब्यात घेवून कायदेशीर कारवाई करतील तडजोड शुल्काची रक्कम रुपये २००/– असून, तडजोड शुल्क न भरल्यास पोलीस न्यायालयात खटले सादर करतील.

याबाबतचे परिपत्रक पोलीस महासंचालक कार्यालयाकडून पोलीसांना प्राप्त झाले असून, आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सुचना पोलीसांना प्राप्त झाल्या आहेत.

अशा प्रकारे रस्त्यात सार्वजनिक ठिकाणी, नो–पार्किंग झोनमध्ये उभी केलेली वाहने, रस्त्यात बेवारस स्थितीत सोडून दिलेली वाहने, याबाबत नागरिकांना काही तक्रार करावयाची असल्यास त्याबाबतची नागरिकांनी **पोलीस नियंत्रण कक्षास हेल्पलाईन क्रमाक ९४०६८३११०० वर किंवा १००** नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधिक्षक विनीता साहु यांनी केलेली आहे.

(signature)

पोलीस अधिक्षक भंडारा
करीता